यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
परीक्षा विभाग

ऑनलाईन पुर्नपरीक्षासंबंधी सूचना
ऑक्टोबर / नोव्हेंबर 2020 मधील अनुत्तीर्ण (Fail) विद्यार्थ्यांसाठी परिपत्रक
[14 ते 19 डिसेंबर 2020]

जा.क्र. 691 दिनांक – 08/12/2020

विद्यापीठाच्या डिसेंबर 2020 मध्ये सोबतच्या वेळापत्रकानुसारच्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सूचना

विद्यार्थ्याने आपल्या पेपरचा दिनांक व वेळ वेळापत्रकानुसार आधीच पाहून खात्री करावी व मगच परीक्षा द्यावी.

विद्यापीठाची डिसेंबर 2020 मध्ये होणारी परीक्षा ही केवळ अंतिम वर्ष / सत्राचे **जे विद्यार्थी ऑक्टोबर 2020 नोव्हेंबर 2020 मध्ये झालेल्या परीक्षेला अनुत्तीर्ण (Fail) झाले तेवढ्याच विद्यार्थ्यांसाठी आहे. विद्यार्थी सर्व अथवा काही पेपर्सना कुठल्याही कारणांनी अनुत्तीर्ण झाला असेल त्याला तेच विषय या परीक्षेला उपलब्ध होतील. ही महत्वाची नोंद घ्यावी.** इतर कुठल्याही अनुपस्थितीत (Absent) विद्यार्थ्यांना ही परीक्षा उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांची विभागनिहाय यादी विद्यापीठाच्या Website वर उपलब्ध आहे. ह्या यादीत ज्यांचे नाव आहे तेच विद्यार्थ्यी ह्या पुरवणी परीक्षेसाठी पात्र आहेत.

1) **सदर परीक्षा 14 डिसेंबर 2020 ते 19 डिसेंबर 2020 दरम्यान वेळापत्रकानुसार घेतल्या जातील.**
2) ऑनलाईन लॉगईन स्लॉट टाईम

   M = Morning = सकाळी - 8.00 AM To 1.00 PM

   A = Afternoon = दुपार - 3.00 PM To 8.00 PM

   परीक्षा पद्धती – बहुपर्यायी प्रश्न, प्रत्यक्ष परीक्षा = 60 मिनिटे वेळापत्रकातील प्रोग्रॅम कोडनुसार आपला पेपर किती तारखेला किती वाजता, कुठल्या लॉगईन स्लॉट मध्ये आहे ते पाहून विद्यार्थ्याने पुरेशा वेळ आधी परीक्षेला सुरुवात करावी. लॉगईन स्लॉट टाईम 5/4 तासांचा असला तरी प्रत्यक्ष परीक्षेचा वेळ 60 मिनिटे आहे, त्या कालावधीत परीक्षा संपवणे आवश्यक राहील. विद्यार्थ्याने परीक्षेला उपलब्ध 50 प्रश्नांपैकी 30 प्रश्न 60 मिनिटांत सोडवायचे आहेत. प्रत्येक प्रश्नाला 2 गुण याप्रमाणे 60 गुणांची परीक्षा होईल आणि 60 गुणांचे रुपांतर 80 गुणात करण्यात येईल.
3) वेळापत्रकानुसार परीक्षा दोन सेशनमध्ये सकाळी (M) 8 ते 1 तर दुपारी (A) 3 ते 8 या वेळेत होईल. प्रत्यक्ष परीक्षा सुरु झाल्यानंतर 60 मिनिटांचा कालावधी सुरु होईल.
4) कुठल्याही कारणास्तव ऑनलाईन परीक्षा (बंद) टर्मिनेट झाल्यास (उदा- इंटरनेट कनेक्टीव्हिटी, पॉवर सप्लाय, अन्य कारणे) विद्यार्थ्याला दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा एकदा लॉग ईन होऊन परीक्षा पूर्ण करता येईल आणि त्याला त्याच्या शिल्लक वेळच पुन्हा उपलब्ध होईल.

   उदा- एखादा विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा सुरु केल्यानंतर 10 मिनिटांतच कुठल्याही कारणाने ऑनलाईन प्रणालीतून बाहेर पडला आणि परीक्षा थांबली तर तो विद्यार्थी दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा लॉग ईन होऊ शकेल, त्याला त्याचा उरलेला वेळ 50 मिनिटे मिळेल, त्याने पूर्वी सोडविलेल्या प्रश्नांशिवाय शिल्लक प्रश्न सोडवण्यास उपलब्ध होतील.
5) विद्यार्थ्याने शक्यतो लॉग ईन स्लॉटच्या सुरुवातीस लवकर परीक्षा देण्यास सुरुवात करावी, जेणे करून जर काही तांत्रिक अडचण निर्माण झाली, तर ती अडचण सोडविण्यास पुरेसा वेळ त्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये उपलब्ध असेल आणि विद्यार्थ्यांला दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईममध्ये परीक्षा पूर्ण करता येईल.

* या परीक्षा Event नंतर या विद्यार्थ्यांना पुन्हा संधी दिली जाणार नाही यातही अनुत्तीर्ण झाल्यास नंतर Repeater परीक्षा अर्ज व शुल्क भरून विद्यापीठाच्या पुढच्या Exam Event ला परीक्षा द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक

परीक्षा नियंत्रक (प्र)